# तारापूर एज्युकेशन सोसायटी, तारापूर, जि.ठाणे

## वार्षिक अहवाल

## दि.१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१

सन्माननीय सभासद बंधु - भगिनींनो,

तारापूर एज्युकेशन सोसायटी व तिच्या विद्यमाने सुरू असलेल्या रा.हि.सावे (माध्यमिक व प्राथमिक),संस्थेची गोपाळ शिवराम बर्वे पूर्व प्राथमिक शाळा, संस्थेची इंग्रजी माध्यमाची न्युक्लिअर फ्रेंडस् इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच ह.दा.(भाऊसाहेब) सावे विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांचा सन २०२० - २०२१ या वर्षाचा अहवाल व सनदी हिशोब तपासणीसांनी जमाखर्च स्थायी समितीच्या वतीने आपणांस सादर करीत आहोत. त्यावर संस्थेच्या दि.२६.०९.२०२१ रोजी होणा-या आभासी वार्षिक सर्वसाधारण सभेत विचारविनिमय करून तो सर्वानुमते मंजूर करावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या चालू वर्षातील दिवंगत सभासद व सन्माननीय व्यक्ती

| | |
|---|---|
| १.कै.श्री.प्रल्हाद जगन्नाथ चंपानेरकर | २७.०३.२०२१ |
| २.कै.श्री.प्रशांत गणपत सावे | १.०५.२०२१ |
| ३.कै. सौ.कामिनी कमळाकर गहला | ३१.०५.२०२१ |
| ४.कै.श्री.भूषण नारायण म्हात्रे | ४.०७.२०२१ |
| ५.कै.श्री.विनायक परशुराम सावे | २७.०८.२०२१ |
| ६.कै.श्री.रमेश चंद्रिकाप्रसाद पाठक | |
| ७.कै.श्री.हरिहर दत्तात्रेय पेठे | |

वरील दिवंगत सन्माननीय व्यक्तीस संस्था श्रद्धांजली वाहत आहे.

## सभा

अहवाला साली स्थायी समितीच्या २ सभा झाल्या. कोविड-१९ च्या प्रार्दुभावामुळे सर्व विद्याशाखांच्या शालेय समितीच्या सभा घेण्यात आल्या नाहीत.

**१.परितोषिक निधी :-**

संस्थेकडे ३१ मार्च २०२१ अखेर रू.८,२०,४५८/- इतका पारितोषिक निधी जमा आहे. या निधीच्या येणा-या व्याजाच्या रकमेतून गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येतात.

**२ . विद्यार्थी सहाय्यक निधी :-**

संस्थेकडे ३१ मार्च २०२१ अखेर रू . ६,४३,४०१ . ५०/- विद्यार्थी सहाय्यक निधी जमा झाला आहे . या निधीच्या व्याजातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप केले जाते .

**३ . विज्ञान फंड :-**

संस्थेकडे ३१ मार्च २०२१ अखेर रू . ६८,५६५/- इतका विज्ञान फंड जमा आहे . या फंडाच्या येणा-या व्याजातून विज्ञान मंडळाच्या विद्यमाने भरविण्यात येणा-या विज्ञान प्रदर्शनातील विद्यार्थ्यांच्या निवडक प्रतिकृतीस पारितोषिके दिली जातात .

तसेच विज्ञान मंडळातर्फे घेण्यात येणा-या विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना पारितोपिके दिली जातात .

**४ . क्रीडा फंड :-**

संस्थेकडे ३१ मार्च २०२१ अखेर रू . ७६,८७३/- इतका क्रीडा फंड जमा आहे . सदर फंडाच्या येणा-या व्याजातून क्रीडाक्षेत्रात विशेष नैपुण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना पारितोपिके देण्यात येतात .

**५ . इमारत निधी :-**

संस्थेकडे ३१ मार्च २०२० अखेर इमारत निधी रू . २,७७,३६,८२४ . ७२/- होता . त्यात अहवालासाठी शिक्षणप्रमी जनता, आजी - माजी शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी व संस्थेचे सन्माननीय सभासद यांच्याकडून मिळालेल्या भरघोस देणग्यांद्वारे रू . १९,१६,000/-ची भर पडून इमारत निधी रू . २,९६,५२,८२४ . ७२/- इतका झाला .

अहवाल सालातील इमारत निधीसाठी देणगी देणा-या देणगीदारांची नावे खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| १ . रिटॉर्ट केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड मुंवई | १0,00,000/- |
| २ . ग्लेनफीन केमिकल्स | ५,00,000/- |
| ३ . श्री . शंकरा हिंदू मिशन | २,६0,000/- |
| ४ . सौ . रोहिणी रविंद्र सावे | ८0,000/- |
| ५ . श्रीमती वीना कुमार चुरी | ५१000/- |
| ६ . सौ . ज्योत्सना दिलीप सावे | २५000/- |

३१ मार्च २०२१ अखेर रू . १८,७७,२९०/- इतका शिक्षण फंड जमा आहे .

१.शालांत परीक्षा :-

मार्च २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाण परीक्षेस विद्यालयातील २०१ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी २०१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शे.१००% लागला. विद्यालयातील कु.ध्रुविका विलास चौधरी ह्या विद्यार्थीनीला शे.९८.२० % गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली. तसेच ९०% पेक्षा अधिक गुण मिळविणारे ११ विद्यार्थी व ८०% पेक्षा अधिक गुण मिळविणारे १२ विद्यार्थी आहेत. संस्था कु.ध्रुविका विलास चौधरी तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

२.न्युक्लिअर फेन्ड्स स्कूल :-

सन २०२० मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाण परीक्षेस विद्यालयातील ४९ विद्यार्थी प्रविष्ट झालेले होते. त्यापैकी ४९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन विद्यालयाचा शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शे.१००.००% लागला. विद्यालयातील कु.अभिषेक शशिकांत सावंत ह्या विद्यार्थ्याला शे.८८.४० % गुण मिळवून विद्यालयात प्रथम आला. कु.अभिषेक शशिकांत सावंत व तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्ग दर्शन करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे.

३. एच्.एस्.सी. उच्च माध्यमिक शालांत परीक्षा :- (विज्ञान व वाणिज्य)

फेब्रुवारी २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एच.एस्.सी.परीक्षेचा तसेच ह.दा.(भाऊसाहेब) सावे विज्ञान कनिष्ट महाविद्यालयाचा निकाल १००.०% लागून कु.खुशी प्रविण सिन्हा हि ९३.००% गुण मिळून कनिष्ट महाविद्यालयात प्रथम आली. याबद्दल कु.खुशी प्रविण सिन्हा हीचे अभिनंदन !

फेब्रुवारी २०२० मध्ये घेण्यात आलेल्या एच्.एस्.सी.परीक्षेचा तसेच ह.दा.(भाऊसाहेब) सावे वाणिज्य कनिष्ट महाविद्यालयाचा निकाल १००.००% लागून कु.गार्गी गौतम फडके हि ८९.८३% गुण मिळून कनिष्ट महाविद्यालयात प्रथम आली. याबद्दल कु.गार्गी गौतम फडके हीचे अभिनंदन !

४.इमारत भाडे :-

संस्था शासनाकडून कोणतेही इमारत भाडे अनुदान घेत नाही. संस्थेच्या ताळेबंदामध्ये नमुद केलेले थकीत भाडे दरवर्षी टप्याटप्याने कमी करण्यात यावे.

५.संगणक व आयटी विभाग :-

संस्थेने विद्यार्थ्यांकरिता अद्ययावत संगणक लॅब ऊभारलेले आहे. संगणक विभागात एकूण ९० संगणक संच आहेत. सदर संगणक विभागातून संस्थेच्या सर्व विद्याशाखेतील सुमारे ३२०० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. या सर्व संगणकावर इंटरनेट सुविधा पुरविण्यात आली आहे.

६.अभिनंदन:-

प्रा. डॉ.श्री.किरण जयदेव सावे - आपल्या संस्थेचे विश्वस्त व शैक्षणिक सल्लागार मा.प्रा. डॉ.श्री.किरण जयदेव सावे यांची सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात नियमित प्राचार्य पदी नियुक्ती झाली त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

## विशेष नोंदी

१. श्री हिंदू शंकरा मिशन व ओ एन जी एल फाइन केमिकल लिमिटेड यांनी सीएसआर फंडातून आपल्या रा.हि.सावे विद्यालयास अद्यायवत "स्वाध्याय " हायब्रीड लायब्ररी उपलब्ध करून दिली.

२. रा.हि.सावे चॅरिटेबल ट्रस्ट आणि संस्थे तर्फे शाळेच्या "मातोश्री" हॉलचे नुतनीकरण करण्यात आले.

# ऋणनिर्देश

१. संस्थेचे सन्माननीय व स्थानिक अंतर्गत हिशोब तपासनीस श्री. मिलिंद भास्कर चुरी व श्री. संतोष भास्कर सावे, श्री. नंदकुमार मनोहर मेस्त्री यांनी स्थानिक हिशोब तपासनीसाची जबाबदारी चांगल्या रितीने व विना मोबदल्याने पार पाडली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

२. संस्थेचे सनदी हिशोब तपासनीस मे. हेमंत एन. चुरी बोईसर यांनी संस्थेचे हिशोब, आयकर रिर्टन फाईल इ. कामे माफक फी आकारून केली त्याबद्दल संस्था त्यांस धन्यवाद देत आहे.

३. मे. रिटॉर्ट केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांनी इमारत निधीसाठी रू.१०,००,०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

४. ग्लेनफीन केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी यांनी इमारत निधीसाठी रू.५,००,०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

५. आर. एच. सावे चॅरिटेबल ट्रस्ट तारापूर यांनी यांनी इमारत निधीसाठी रू.५,००,०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

६. श्री. शंकरा हिंदू मिशन यांनी इमारत निधीसाठी रू.२,६०,०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

७. सौ. रोहिणी रविंद्र सावे यांनी इमारत निधीसाठी रू.८०,०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

८. श्रीमती वीना कुमार चुरी यांनी इमारत निधीसाठी रू.५१०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

९. सौ. ज्योत्सना दिलीप सावे यांनी इमारत निधीसाठी रू.२५०००/- ची भरीव देणगी दिली त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

१०. श्री. दयानंद जाधव :- हिशोब तपासनीस

श्री. दयानंद जाधव यांनी तारापूर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेच्या व सर्व विद्याशाखांच्या अंतर्गत हिशोब तपासनीसाचे काम आपला अमूल्य वेळ देऊन केले त्याबद्दल संस्था श्री. दयानंद जाधव यांची आभारी आहे.

गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फी मिळविण्याच्या हेतुने अनेक दात्यांनी दिलेल्या देणग्यांमुळे गरीब विद्यार्थी फंड वृध्दिंगत होत असतो. दरवर्षी या गरीब विद्यार्थी फंडाच्या येणा-या व्याजाच्या विविध स्पर्धामध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात. शैक्षणिक व आर्थिक मदतीबद्दल संस्था व विद्यालय सर्व दात्यांची अत्यंत ऋणी आहे.

अहवाल साली पारितोषिक निधी, विद्यार्थी सहाय्यक निधी, इमरत निधी, ज्युनिअर कॉलेज शिक्षण फंड, किडा निधी, विज्ञान निधी व संस्थेने चालवलेल्या इतर उपकमांसाठी ज्या ज्या व्यक्तींची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष या संस्थेस मदत केली आहे त्या सर्वांचे संस्था मन:पूर्वक आभार मानित आहे. यापुढेही त्यांनी संस्थेवर असेच प्रेम व लोभ ठेवावा ही अपेक्षा करीत आहोत.

सर्वाना पुन:श्च मन:पूर्वक धन्यवाद!